Estd: 6 Jan. 1979
Reg.No.:MAH/1184/Kop.
E-mail : bacpvd@yahoo.co.in

UGC (2 f & 12 B) dt. 23 June 2006
Perm. Affi.No.Affi/T.2/SGB/10780 dt.16 Feb.2005
Jr.College Index No.23-06-004 J

Jayprakash Education Society's

# DR. BABASAHEB AMBEDKAR MAHAVIDYALAYA

Barrister Tatyasaheb Mane Vidyanagar, Peth Vadgaon - 416112.
Dist. Kolhapur (Maharashtra) Ph.Office : 0230-2471086

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

Founder Chairman : **Hon. Adv. Nanasaheb S. Mane** B.A., LLB., Ex.MLA
Chairman : **Shri. Satish S. Mane** M.A., M.Phil
Principal : **Dr. S. D. Disale** M.Sc. Ph.D
Mob. : 7709880950

## 3.4.2.

***Number of functional MoUs with national and international institutions, universities, industries, corporate houses etc. during the year 2021-22***

***Particulars-***

| Sr. No. | Title of the collaborative Activity | Name of Linking Agency | Name of the Participant | Year of Collaboration | Duration |
|---|---|---|---|---|---|
| 1. | MoU | Shivaji Vidyapith Marathi Shikshak Sangh, Kolhapur | Department of Marathi | 2018-23 | 05 Years |

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Peth Vadgaon Dist.Kolhapur

Principal,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon,Dist.Kolhapur,Maharashtra

स्थापना : दि. ५ मे, २००८
नों. क्र. महा./२४९२९/को./११/०७/०८

# शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर,

अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी अ, सानेगुरुजी वसाहत,

कोल्हापूर ४१६०११

आणि

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव

ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

## यां संस्थातील सामंजस्य करार

## MEMORANDUM OF UNDERSTANDING

**दिनांक : १० जुलै २०१८**

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2017 © ST 140846

- 6 APR 2018

दिनांक 346 वि.नं................ स्टॅम्प किंमत रु.

-4 APR 2018

STAMP HEAD CLERK
TREASURY OFFICE
KOLHAPUR (M.S.)

रक्कम रु. ( 100 ) दिले स्टॅम्प कोड क्र.

ॲफिडेव्हीट, करारपत्र, बॉन्ड व मुखत्यारपत्र, कोर्टी फी

## सामंजस्य करार

## MEMORANDUM OF UNDERSTANDING

**शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर**

**आणि**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगांव, ता.हातकणंगले जि.कोल्हापूर.**

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर हा विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे तसेच संशोधन करणे हे संघाचे ध्येय आहे. मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञान प्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात.

त्यानुसार विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे तसेच कार्यशाळांमध्ये बौध्दिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, कथाकथन, काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधांना पारितोषिक, ललित व ललितेतर ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. संघामार्फत 'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक प्रसिध्द केले जाते. त्याचा ISSN No.2319-6025 असून शिवाजी विद्यापीठ आणि यु.जी.सी. मान्यताप्राप्त यादीमध्ये पत्रिकेचा समावेश झालेला आहे.

वरील नमूद केलेल्या शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठवडगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर या संस्था एकमेकांबरोबर सामंजस्य करार दि. ०६ एप्रिल २०१८ रोजी करत आहेत. या कराराची उद्दिष्टये खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

**उद्दीष्टये**

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.

२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.

३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे.

४. निबंध, वक्तृत्व, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे.

५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे.

६. व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.

७. दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक एक/दोन दिवसांचे अधिवेशन विविध साहित्यिक विषयांवर घेणे. सदर अधिवेशनात प्राध्यापकांच्या शैक्षणिक तसेच विषयांच्या समस्यांवर चर्चा करणे.

८. सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.

९. मोडी लिपी, मुद्रितशोधन, पत्रकारिता इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

१०. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे.

११. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना यासंदर्भात सूचना-पत्रव्यवहार करणे.

**एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

२. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.

३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.

४. त्रैमासिकाव्दारे साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे.

५. दरवर्षी संघाचे अधिवेशन विविध कॉलेजवर आयोजित करुन विचारविनीमय करणे.

६. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे.

**अटी**

१. आपआपल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.

२. परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Peth Vadgaon Dist. Kolhapur

३. कोणत्याही महाविद्यालयांस प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

४. सदर परस्पर सामंजस्याचा कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल.

५. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.

६. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

**समन्वय**

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी शिक्षक संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे समन्वयक म्हणून प्राचार्य अथवा विभागप्रमुख काम करतील.

२. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.


३. खालील स्वाक्षऱ्यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयिक अधिकाऱ्यांत होत आहे तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **डॉ.सर्जेराव पद्माकर** | **प्रा.आर.एम.मिरजकर** | **डॉ.प्रकाश दुकळे** | **डॉ. शिवकुमार सोनाळकर** |
| **विभाग प्रमुख व समन्वयक** | **प्राचार्य** | **सचिव** | **अध्यक्ष** |

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठवडगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.**


**शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर**

## Jayprakash Education Society's
## Dr. BabasahebAmbedkarMahavidyalaya, Peth- Vadgaon
## Guest Lecture/Quiz/wall paper
## Activity Report

| | |
|---|---|
| Name of the Activity | Guest Lecture – <br>डॉ. प्रकाश दुकळे, डॉ. सोमनाथ कदम, डॉ. संजय कांबळे. |
| Committee | Department of Marathi |
| Target Group &Participants | All Students |
| Topic/Theme | अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यिक योगदान |
| Date | ३१/०७/२०२१ |
| Place | All College (Online Mode) |
| Brief Report | अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यिक योगदानखूपच आहे. अल्पशिक्षित असतानासुद्धा सर्वसामान्य, दलित, स्त्रियांचे दुःख मांडणारे साहित्य म्हणजे अण्णाभाऊचे साहित्य होय. त्याचे कथा, कविता, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन असे विपुल लेखन आहे. ज्यामधून सामान्य माणसाचे व स्त्रियांचे जीवन अवशेष स्पष्ट होतात. |
| Photograph |  |

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Peth Vadgaon Dist.Kolhapur

# Jayprakash Education Society's
# Dr. BabasahebAmbedkarMahavidyalaya, Peth- Vadgaon
## Guest Lecture/Quiz/wall paper
## Activity Report

| | |
|---|---|
| Name of the Activity | Guest Lecture –<br>डॉ. आनंद बल्लाळ, यश तिवारी. |
| Committee | Department of Marathiand English |
| Target Group &Participants | All Students |
| Topic/Theme | The Pandemic In Modern Literary Narratives<br>कोरोना काळातील वांगमय निर्मिती |
| Date | २९/०८/२०२१ |
| Place | All College (Online Mode) |
| Brief Report | कोरोन काळात अनेक भयावह जगण्याच्या अवस्थेला सर्वांनाच सामोरे जावे लागले या जगण्याचे संदर्भ यश तीवरी आणि आनंद बल्लाळ यांच्या कादंबऱ्यातून कसे आविष्कृत झाले आहेत याचा आढावा प्रत्यक्ष लेखकांच्या द्वारे स्पष्ट करण्यात आला. या दोन्ही लेखकांनी कोरोना काळातील जगण्याचे विविध पदर उलघडून दाखवले. |
| Photograph |  |


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Peth Vadgaon
Dist.Kolhapur

**Jayprakash Education Society's**

**Dr. BabasahebAmbedkarMahavidyalaya, Peth- Vadgaon**

**Guest Lecture/Quiz/wall paper**

## Activity Report

| | |
|---|---|
| Name of the Activity | Guest Lecture – डॉ. पृथ्वीराज तौर, डॉ. गिरीश मोरे |
| Committee | DEPARTMENT OF MARATHI |
| Target Group &Participants | ALL COLLEGE |
| Topic/Theme | "शरण कुमार लिंबाळे यांच्या सनातन" या कादंबरीवर व्याख्यान |
| Date | २२/०८/२०२१ |
| Place | At College (Online Mode) |
| Brief Report | शरण कुमार लीबले यांच्या सनातन या कादंबरीस सरस्वती पुरस्कार मिळाल्यानंतर वेगवेगळ्या उलट सुलट चर्चा झाल्या त्यामुळे या कादंबरीचे महत्व स्पष्ट करण्यासाठी तिचे बलस्थान, मर्यादा यामधून स्पष्ट करण्यात आल्या. |
| Photograph |  |

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Peth Vadgaon Dist. Kolhapur